**सुप्रिम इंडस्ट्रिअल प्रिमायसेस सहकारी संस्था मर्यादित.**

पत्ता :– स.न.४९/१, पर्वती, पुणे:–४११ ००९.

नोंदणी क.:– पीएन्ए/पीएन्ए– १ / जीएनएल (सी)/४३४/१९९८–१९९९.

नोंदणी दिनांक :–१५/०५/१९९८.

---

# विशेष सर्वसाधारण सभेचा वृत्तांत

सुप्रिम इंडस्ट्रिअल प्रिमायसेस सहकारी गृहरचना संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा दिनांक २०.०१.२०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता श्री.घोडके शोरूम येथे आयोजित करण्यात आली होती. सदर सभेस सर्व सभासद उपस्थित होते. सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्री.नाईक उपस्थित होते. अध्यक्षांनी उपस्थित सभासदांचे स्वागत केले व सभेचे कामकाज मा. श्री.नाईक यांनी विषय पत्रिकेप्रमाणे करावे असे सुचित केले. सदर सभेमध्ये खालील विषयांवर चर्चा होउन पुढील पुढील निर्णय घेण्यात आले.

विषय क्रमांक ०१ :- संस्थेच्या पुर्नबांधणी प्रकल्पाबाबत प्राथमिक निर्णय घेणेबाबत.
ठराव क्रमांक ०१ :- सचिव श्री.नितीन शहा यांनी आजच्या सभेसाठी पुर्नविकसनाबाबत सभासदांना मार्गदर्शन करण्यास आमंत्रित केलेले श्री.संजय सुर्यवंशी यांची सभासदांना ओळख करून दिली. व त्यांना पुर्नविकसना बाबत मार्गदर्शन करण्याची विनंती केली.

श्री.संजय सुर्यवंशी यांनी प्रथम सभासदांना सहकार खात्याच्या ३ जानेवारी २००९ आणि आता नवीन सहकार खात्याचे ४ जुलै २०१९ च्या परिपत्रकाबाबत विस्तृत माहिती दिली. सदर प्रक्रिया चार टप्प्यात विभागली गेली आहे व प्रत्येक टप्प्याबाबत विस्तृत विवेचन त्यांनी सभेपुढे केले. त्यावर सभासदांनी वेगवेगळया शंका विचारल्या एकूण सर्व चर्चा सकारात्मक पध्दतीने झाली तसेच सभासदांकडून मांडण्यात आलेल्या शंकांना योग्य पध्दतीने सकारात्मक दृष्टिकोनाने शंकासमाधान करण्यात आले. व याचा विचार करताना सभासदांचा पुर्नबांधणी करण्यासाठी कौल असल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार सचिव यांनी सदर पुर्नबांधणी प्रस्तावास अनुमोदन असल्यास हात वर

करावेत असे सुचविले. त्यानुसार उपस्थित सभासदांपैकी ७३ टक्के सभासदांची पुर्नबांधणी प्रस्तावास प्राथमिक मंजुरी असल्याचे सांगण्यात आले.

अशा रितीने पुर्नबांधणीप्रस्ताव एकमताने मंजुर करण्यात आला.

सुचक:-श्री.सुधीर पांडे अनुमोदक :-श्री.भालचंद्र खैरे

ठराव सर्वसंमत

विषय क्रमांक ०२ :- सदर पुर्नबांधणी प्रस्तावाच्या कार्यवाहीबाबत पुर्नविकास समिती नेमणे व त्यांना अधिकार देणेबाबत.

ठराव क्रमांक ०२ :- संस्था इमारत पुर्नबांधणी प्रस्तावाच्या कार्यवाहीबाबत विवेचन श्री.संजय सुर्यवंशी यांनी सभेपुढे केले. त्यानुसार सहकार खात्याने ३ जानेवारी २००९ आणि आता नवीन सहकार खात्याचे ४ जुलै २०१९ रोजी संस्था इमारत पुर्नविकास करणेसाठी विशेष परिपत्रक काढण्यात आले. त्यानुसार त्यातील आवश्यक बाबींची पुर्तता करण्यासाठी, सदर बाबत आवश्यक माहिती गोळा करणे, वेगवेगळया एजन्सीची माहिती घेणे, त्यांच्याकडून कामाच्या स्वरूपानुसार दरपत्रक तसेच निविदा मागविणे, या सर्व गोष्टीवरील उल्लेख

केलेल्या परिपत्रकातील आवश्यक बाबींची पुर्तता करणेकामी कार्यवाही करणेबाबत संस्थेची पुर्नविकास समिती व व्यवस्थापक समितीस अधिकार देण्याबाबत सदर ठरावाद्वारे सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. सदर समिती पुढीलप्रमाणे :-

इमारत पुर्नविकास व व्यवस्थापक समिती

| सभासदांची नावे | पद |
|---|---|
| १. श्री. विजय नाईक | अध्यक्ष |
| २.श्री. नितीन शहा | सचिव |
| ३. श्री.धनंजय घोडके | खजिनदार |
| ४. श्री.राजीव गोटाडकी | सदस्य |
| ५. श्री. सुधीर पांडे | सदस्य |
| ६. श्री. भालचंद्र खैरे | सदस्य |
| ७. श्री.हेमंत नाईक | सदस्य |

सुचक :-श्री. सुधीर पांडे अनुमोदक :-श्री. हेमंत नाईक

ठराव सर्वसंमत

विषय क्रमांक ०३ :- सदर प्रकल्पाच्या कार्यवाहीसाठी प्रकल्प सल्लागार व निर्णय घेणेबाबत.

ठराव क्रमांक ०३ :- सदर विषयाबाबत सहकार खात्याच्या परिपत्रकानुसार आवश्यकतेनुसार वेगवेगळया एजन्सीज् नेमणे, प्रोफेशनल सल्ला घेणे, आवश्यक ती कागदपत्रे तयार करून घेणे, आवश्यक त्या पध्दतीचा अवलंब करणे यासाठी लागणारे सर्व मार्गदर्शन त्या त्या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींकडून घेणे आवश्यक आहे. त्याचे महत्व तसेच त्याबाबतच्या आर्थिक बाबी या सर्व गोष्टी मा. पदाधिकाऱ्यांकडून सभासदांपुढे मांडण्यात आल्या सभासदांकडून याबाबत वेगवेगळी माहिती विचारण्यात आली. तसेच काही शंका उपस्थित करण्यात आल्या. परंतु त्या सर्व शंकांचे योग्य पध्दतीने व आवश्यक माहिती पुरवून समाधान करण्यात आले. त्यानुसार प्रकल्प सल्लागार एजन्सी नेमणेबाबत सर्व सभासदांचे एकमत झाले. व त्यानुसार संस्थेकडे आलेल्या निविदेनुसार डी.जी. असोसिएटस् हि सोसायटी प्लसची Sister Concern म्हणुन या संस्थेची निवड सदर सभेमध्ये एकमताने करण्यात आली. तसेच पुर्नबांधणी प्रकल्पाअंतर्गत सर्व प्रोफेशनल व्यक्तिंची टिम यामध्ये काम करणार आहे व त्यानुसार सदर कामाची एकूण प्रोफेशनल फी रू.८,००,०००/- ठरविण्यात आले. सदर रक्कम निविदेनुसार वेगवेगळया टप्प्यांमध्ये देण्यात येईल.

सुचक:-श्री. राजीव गोटाडकी                    अनुमोदक :-श्री. भालचंद्र खैरे

ठराव सर्वसंमत

विषय क्रमांक ०४ :- संस्थेच्या इमारत पुर्नविकासासंबंधीच्या कार्यक्रमाची रूपरेषा सादर करणे.

ठराव क्रमांक ०४ :- श्री.संजय सुर्यवंशी यांनी सभेपुढे इमारत पुर्नविकासासंबंधिच्या कार्यक्रमाची रूपरेषा मांडली. त्यामध्ये पहिल्या दोन टप्प्यांच्या 1.Feasibility Report कार्यवाहीच्या स्वरूपाबाबत माहिती दिली व त्याबाबतच्या कार्यवाहीचे अधिकार रिडेव्हलपमेंट कमिटी व प्रकल्प सल्लागार यांना देण्यात आले. सदर प्रोसेसची कार्यवाही पुर्ण करून साधारण दोन ते तीन महिन्यांत विशेष सर्वसाधारण सभा घेऊन कार्यवाहीचा अहवाल सादर करण्यात येईल.

सुचक:- श्री. हेमंत नाईक                    अनुमोदक :-श्री. सुधीर पांडे

ठराव सर्वसंमत